**(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद )**

**मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकारितेतील**

**फौजदारी अपील अधिकारिता**

**फौजदारी पुनरीक्षण अर्ज क्रमांक. १०६ / २०१७**

1. शंकर छाना वसावा वय ३०,

   रा. अथल , साई व्हिला, रूम

   नंबर ३०३, सिल्वासा.

2. अश्विन रामनरेश सिंह ,वय ३१,

   रा. भुरकुड फलिया सिल्वासा

3. चेतन माकन पटेल (वय ३२,

   रा. भस्त फलिया,

जानूभाई सिल्वासा यांच्या भाड्याच्या खोलीत.

4. अवधेश संपत यादव

वय सुमारे ३२ वर्षे,

रा. अथल, साई विला,

रूम नंबर ३११, सिल्वासा **.... अर्जदार**

विरुद्ध

राज्य (केंद्रशासित प्रदेश) दादर आणि नगर हवेली.

**...उत्तरवादी**

अर्जदार तर्फे वकील राहुल कामेरकर यांच्या निर्देशाने  जेन कॉक्स सह  राहिल फजलभॉय,

उत्तरवादी क्र १  तर्फे वकील एच. एस. वेणेगावकर यांच्या निर्देशाने हर्ष देढिया.

*****

**कोरम : न्यायमूर्ती  एस. एम. मोडक**

**दिनांक : २२ व २६ मार्च २०२४**

**न्यायनिर्णय :-**

1. या पुनरीक्षण अर्जात समाविष्ट मुद्दा असा आहे की न्यायचौकशी  न्यायालयाने म्हणजेच मुख्य न्यायिक दंडाधिकारी, दादर आणि नगर हवेली, सिल्वासा आणि  सत्र न्यायाधीश, दादर नगर हवेली  यांच्या न्यायालयाने   भारतीय दंड संहितेच्या कलम ३४१, ३२३ आणि ३४  (थोडक्यात "आयपीसी") अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी पहिल्या चार अर्जदारांना दोषी ठरवण्यात अवैधता केली  आहे का  ? ज्यांच्या विरुद्ध सिल्वासा पोलिस स्टेशनने प्रथम  माहितीदेणारा  - सुरेश माडंबिल कॅलरीकल यांना दि.२९ मार्च २००७ रोजी रात्री २२.३० वाजता अथल  सिंधुर फलिया या गावात  मारहाण केल्याप्रकरणी आरोपपत्र दाखल केले होते.

2. खटल्यानंतर ठोठावण्यात आलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :-

    1. भा. द. वि.कलम ३४१ अन्वये गुन्ह्यासाठी एक महिन्याचा कारावास.
    2. भा. द. वि.कलम ३२३ अन्वये गुन्ह्यासाठी तीन महिन्यांचा कारावास.

तर, भा. द. वि.कलम ५०४, ५०६ सह ३४ मध्ये या सर्वांची शिक्षा पात्र गुन्ह्यांसाठी निर्दोष मुक्तता करण्यात आली. हा निर्णय दि. ९ डिसेंबर २०१४ च्या निर्णयानुसार आहे. विद्वान सत्र न्यायाधीशांनी ३१ जानेवारी २०१७ च्या निर्णयानुसार दोषी ठरवून शिक्षा कायम केली

3. या न्यायालयाने दि.१७ फेब्रुवारी २०१७ च्या आदेशानुसार पुनरीक्षण स्वीकारले. अशा प्रकारे, मी अर्जदारतर्फे विद्वान वकील कु.जेन कॉक्स आणि उत्तरवादी क्रमांक १ तर्फे विद्वान वकील श्री हर्ष देडिया यांचे म्हणणे ऐकले. दोन्ही वकिलांनी पुनरीक्षणच्या व्याप्तीच्या मुद्द्यावर तसेच खालील दोन्ही न्यायालयांनी योग्य किंवा चुकीच्या पद्धतीने केलेल्या पुराव्यांना वाव देण्याच्या मुद्द्यावर या दोघांचे ही प्रगत युक्तिवाद आहेत. पुनरीक्षणच्या व्याप्तीच्या मुद्द्यावर दोघांनीही काही निकालांचा आधार घेतला. कु.कॉक्स यांनी खालील निर्णयांचा आधार घेतला:-

पुनरीक्षण ची व्याप्ती

**अ) जोसेफ विरुद्ध केरळ राज्य**[1]

माननीय सर्वोच्च न्यायालयाने साक्षीपुराव्यांचे विवेचन करत मुद्दा हाताळला यात शंका नाही, परंतु तो दोषसिद्धीच्या समांतर निकालाच्या पार्श्वभूमीवर नाही, तर अपिलीय न्यायालयाकडून निर्दोष मुक्तीचा निर्णय आणि पुराव्यांचे विवेचन करण्याचा विषय होता.

---

1) 2003(1)एससीसी 465

**ब) राज्य विरुद्ध भारवाड जाक्षीभाई नागरीभाई आणि इतर [2]**

त्याचप्रमाणे या प्रकरणात गुजरात उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निर्दोष मुक्ततेच्या निर्णयाविरोधात राज्य सरकारने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी केली. पहिल्या आदेशाविरुद्धच्या अपिलात पुराव्यांचे विवेचन करण्यास प्रचंड वाव आहे.

**क) अमित कपूर विरुद्ध रमेश चंदेर आणि इतर वगैरे [3].**

यात शंका नाही की, पुनरीक्षणाची कार्यवाही झाली आणि संहितेच्या कलम ३९७ किंवा ४८२ अन्वये आरोप रद्द करण्याची तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत असा प्रश्न केस सुरु होणेच्या आधी निर्माण होतो. चौकशीची व्याप्ती वेगळी आहे. माझे लक्ष परिच्छेद ८ कडे वेधले गेले. जर पुराव्याअभावी किंवा वास्तविक पुराव्याकडे दुर्लक्ष करून निर्णय नोंदविले तर पुनरीक्षण अधिकारक्षेत्राला आव्हानात्मक होऊ शकते. ही निरीक्षणे खटल्यादरम्यान नोंदवलेल्या पुराव्यांना वाव देऊन उद्धृत केलेल्या निकालांच्या आधारे होती. त्याच निर्णयात, परिच्छेद ९ मध्ये, असे निरीक्षण नोंदवले गेले आहे की " उच्च न्यायालयाचे पुनरीक्षण कार्यक्षेत्र खूप मर्यादित आहे आणि ते नियमित पणे वापरले जाऊ शकत नाही."

(परिच्छेद ९)

2) 1989 एससीसी ऑनलाइन गुजरात 40

3) मनू / एस सी / 0746/2012

ड) रामब्रिक्षा सिंह विरुद्ध अंबिका यादव [4]

ज्यामध्ये पहिल्या सुनावणीनंतर हे प्रकरण प्रतिप्रेषित करण्यात आले आणि प्रतिप्रेषित आदेशाला माननीय सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. यामध्ये वादाचा मुद्दा हा आहे कि उच्च न्यायालयाने पुनरीक्षणातील पुराव्यांचे पुनरीक्षण केले आहे, असा युक्तिवाद केला जात आहे.अखेर गुणवत्तेच्या आधारे या प्रकरणाचा निकाल लागला नाही, तर केवळ प्रतिप्रेषित करण्यात आले, या कारणास्तव ते फेटाळण्यात आले.

इ) मधुकर गौरीशंकर स्वामी विरुद्ध महाराष्ट्र राज्य [5]

या प्रकरणात या न्यायालयाच्या एकल न्यायमूर्तींने वस्तुस्थिती आणि शिक्षा यांचा समवर्ती निष्कर्ष रद्द बातल ठरवला आहे. हा वाहन रहदारीचा गुन्हा होता. दोन साक्षीदारांच्या पुराव्याच्या आधारे दोष सिद्ध झाला. प्रत्यक्षात १७ साक्षीदार असताना केवळ २ साक्षीदार तपासण्यात आले असून २ साक्षीदारांनी अपघात पाहिलेलाच नाही. या तत्त्वाचा पुनरुच्चार करण्यात आला "ज्या प्रक्रियेचे पालन करणे आवश्यक आहे किंवा आदेशाच्या वैधतेच्या संदर्भात कोणतीही बेकायदेशीरता केली जाणार नाही याची खात्री करण्यासाठी पुनरीक्षण अधिकारक्षेत्राचा वापर केला जाऊ शकतो".

---

4) 2004 क्रि.एल.जे.3115

5) क्रि. रेव्हि. अप्लिकेशन क्र. 83/1997

४. याउलट, विद्वान अधिवक्ता श्री देडिया यांनी खालील निर्णयांचा आधार घेतला:-

(अ ) मलकीत सिंग विरुद्ध छत्तीसगड राज्य [6]

माननीय सर्वोच्च न्यायालयाने पुनरीक्षण न्यायालयाच्या अधिकाराच्या मर्यादा आणि ते अपीलीय न्यायालयाच्या अधिकारांपेक्षा कसे भिन्न आहेत याबद्दल च्या तत्त्वाचा पुनरुच्चार केला. (परिच्छेद ८)

(ब ) मंजू राम कलिता विरुद्ध आसाम राज्य [7]

> तीन न्यायालयांनी आपापली कामगिरी बजावली आहे आणि हे प्रकरण माननीय सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने या निष्कर्षात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. अगदी भिन्न मतेही शक्य होती , अपवादात्मक परिस्थिती असल्याशिवाय समवर्ती निष्कर्षांमध्ये ढवळाढवळ करता येत नाही. (परिच्छेद १०)

## निष्कर्ष

5. हे सर्व निर्णय वाचल्यानंतर यातील तत्त्वे सारखीच आहेत.पुनरीक्षण कोर्टाच्या मर्यादा आहेत. येते मर्यादा घालानेमागे एक ठराविक हेतू आहे . हे निर्बंध सी.आर.पी.सी कलम ३९७ व ४०१ या तरतुदींमध्ये समाविष्ट नसले तरीही घटनात्मक न्यायालयांनी कायद्याचा तसा अर्थ लावलाआहे.

6)क्रि. रेव्हि. अप्लिकेशन क्र.915/2022

7) 2009 ( बी ) एस सीसी 330

6. खटल्याची सुनावणी कनिष्ठ न्यायालयात सुरू असताना आरोपींनी उपलब्ध असलेले सर्व बचाव घ्यावेत, अशी अपेक्षा असते. तथापि, जेव्हा अपील करणेचा अधिकार फौजदारी प्रक्रिया संहितेद्वारे प्राप्त आहे , तेव्हा त्यामध्ये तो न्यायालयाला पुरावे पुन्हा तपासानेची विनंती करू शकतो आणि निष्कर्ष सुधारण्याची अपेक्षा अपीलीय न्यायालयाकडून करू शकतो.असे असूनही जर त्याला वाटले आणि त्या न्यायालयात जाण्याची संधी मिळाली, तर हे न्यायालय पुन्हा पुराव्यांचे विवेचन करण्याची कसरत करेल, तर कधी खटला संपणार नाही.

## पुराव्यांचे विवेचन

7. विवेचन म्हणजे काय? पुराव्यांचे विवेचन करणे म्हणजे थोडक्यात पुराव्याची पडताळणी करणे म्हणजे :--

1. साक्ष विश्वसनीय आणि खात्रीलायक आहे की नाही.

2. एक पुरावा दुसर्या पुराव्याला पुष्टी देतो की नाही.

याचा अर्थ असा नाही की पुनरीक्षण न्यायालयासमोर आरोपींना समवर्ती निष्कर्षांना आव्हान देण्यास वाव नाही. याचा अर्थ असा लावला गेला आहे की "जेव्हा पुराव्याचा भागाचा विचार न करता निष्कर्ष नोंदवले जातात किंवा चुकीच्या पुराव्याचा भागाच्या आधारे नोंदवले जातात . निष्कर्ष विपर्यस्त असल्याचे म्हटले जाते आणि मग त्याला आवाहन देणेस वाव मिळतो.

8. शेवटी कनिष्ठ न्यायालयाला पुराव्यांची विवेचन करताना त्यांच्यासमोर आणलेल्या सर्व परिस्थितीचा विचार करावा लागतो आणि शेवटी त्यांना योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचावे लागते.त्याच्या सोबत कारणे द्यायलाच हवी. म्हणजे, "फिर्यादीपक्षाच्या वतीने अभिलेखवर

आणलेली परिस्थिती आणि बचाव पक्षाने अभिलेखवर आणलेल्या परिस्थितीचा समग्र विचार करणे आवश्यक आहे ". ट्रायल कोर्टाने ही परिस्थिती एकमेकांच्या विरोधात मांडावी लागते आणि मग कोण बरोबर आहे याचा स्पष्टरित्या निष्कर्ष काढावा लागतो .

9. या तत्त्वांचा विचार करून मी खाली दोन्ही न्यायालयांनी नोंदवलेले पुरावे आणि निष्कर्ष पाहिले आहेत. एकूण ४ साक्षीदार आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पी.डब्ल्यू.१ | सुरेश मदान्बील कालेरिकर | प्रथम माहिती देणारा |
| 2. | पी.डब्ल्यू.२ | नीलेश आर. पटेल | पंच |
| 3. | पी.डब्ल्यू. ३ | दत्तूभाई पटेल | आयओ |
| 4. | पी.डब्ल्यू.४ | डॉ.सुनील रमेश पटेल, (आधीचे डॉक्टरांनी प्रथम माहिती देणाऱ्याला आणि आरोपी क्रमांक २ - अश्विन सेठ यांना दिलेल्या तपासणी व प्रमाणपत्राच्या आधारे) | वैद्यकीय अधिकारी |

फिर्यादी पक्षाचे पुरावे

१0. फिर्यादी पक्षाच्या पुराव्यांवरून दर्शविलेले प्रकरण पुढीलप्रमाणे :-

i) प्रथम माहितीदार – सुरेश कलेरी हे आयपीसीए लॅबोरेटरी कंपनीच्या पॅकिंग विभागात सहाय्यक व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. कामगारांनी केलेल्या पॅकिंगच्या कामावर देखरेख ठेवणे हे त्याचे काम आहे. पॅकिंग विभागात काम करणाऱ्या सर्व आरोपींना ते ओळखतात .

ii) ते आपले काम नीट करत नव्हते, त्यामुळे त्यांनी त्यांना रागावले होते. ही घटना २९ मार्च २००७ रोजी रात्री १०.३० च्या सुमारास घडली होती. ते ऑफिसमधून घरी परतत होते. पोलिस चौकीजवळ आल्यावर त्याना तेथे चार आरोपी उभे असल्याचे दिसले. आरोपी क्रमांक २ - अश्विन देखील आपली स्प्लेंडर मोटारसायकल चालवत होता. त्याने पहिल्या माहिती देणाऱ्याच्या मोटारसायकलला धडक दिली. तिन्ही आरोपींनी पहिल्या माहिती देणाऱ्याला दगड आणि मुठीच्या सहाय्याने मारहाण केली.

iii) प्रथम माहितीदाराने कंपनीतील कर्मचाऱ्यांना बोलावून कंपनीच्या रुग्णवाहिकेतून विनोबा भावे सिव्हिलमध्ये हलवले

iv) त्यांनी २९ मार्च २००७ रोजी रात्री २०.३० वाजता फिर्याद नोंदविली.

v) तपासादरम्यान पी.डब्ल्यू.३ ने घटनास्थळावरून हेल्मेट जप्त केले असून प्रथम माहिती देणारा व आरोपी क्रमांक २ च्या मोटारसायकलीही जप्त केल्या आहेत.

Vi ) विनोबा भावे सिव्हिल हॉस्पिटलचे डॉ. मनोज सिंग यांनी प्रथम माहिती देणारे व आरोपी क्रमांक २ यांचीही तपासणी केली. मात्र, शैक्षणिक रजेमुळे सुनावणीच्या वेळी ते उपलब्ध नव्हते. त्या जागी डॉ सुनील पटेल यांनी, डॉ. मनोज सिंग यांनी केलेल्या तपासणीच्या आधारे पुरावे दिले. ते त्यांचे हस्तलेखन ओळखतात.

## सिद्ध वस्तुस्थिती /अनुमान

11. वरील पुराव्यांवरून काही  वस्तुस्थिती  सिद्ध होते हे आपण पाहू शकतो /काही अनुमान काढता येतात :-

अ )  पी.डब्ल्यू.३ ने साक्ष दिली कि प्रथम माहिती देणारा - सुरेश याला जखण झाली होती दि. २९ मार्च २००७ रोजी रात्री ११.४५ वाजता त्यांची तपासणी करण्यात आली.

ब ) आरोपी क्रमांक २ अश्विनच्या डाव्या गुडघ्याच्या सांध्याला ही दुखापत झाली होती.२९ मार्च २००७ आणि ३० मार्च २००७ च्या मध्यरात्री ० .२० वाजता त्याच रुग्णालयात त्यांची तपासणी करण्यात आली.

क )  प्रथम माहिती देणारा सुरेश व सर्व आरोपी एकाच कंपनीत कामाला होते. पॅकिंग विभागातील आरोपींच्या सेवेबाबत कागदपत्रे गोळा करण्याच्या मुद्द्यावर तपास अधिकाऱ्यांची उलटतपासणी करण्यात आली, तर साक्षीदारांच्या उलटतपासणीदरम्यान सर्व आरोपी ,संघाचे पदाधिकारी यांच्यात काही वाद असून तडजोडीचा करार होणे बाकी आहे, असे सुचविण्यात आले.

ड )  प्रत्यक्ष हल्याच्या विषयाबद्दल अभिलेख  पाहता प्रथम माहिती गार वगळता इतर कोणतेही साक्षीदार तपासले गेले नाहीत. मात्र, प्रथम माहिती देणाऱ्याने आरडाओरडा केल्यानंतर त्या व्यक्ती तेथे जमा झाल्याचे पुराव्यात समोर आले आहे.

इ )अभिलेख पाहता  प्रथम माहिती  देणाऱ्याला रुग्णालयात हलविण्यासाठी घटनास्थळी आलेल्या कंपनीच्या कोणत्याही प्रतिनिधीची तपासणी केलेली  नाही, ही नोंद करण्याची बाब आहे.

12. अभिलेखावरील या सिद्ध तथ्ये / पुरावे / निष्कर्षांच्या आधारे या न्यायालयाला निष्कर्षांची वैधता तपासावी लागेल.

## सादर निवेदन

13. विद्वान अधिवक्ता सुश्री कॉक्स यांनी खालील प्रमाणे बाजू मांडली:-

(1) प्रथम माहिती देणाऱ्याच्या पुराव्यात म्हणजेच एफआयआरमधील पुराव्यात आणि न्यायालयासमोर दिलेल्या पुराव्यात सुधारणा आहेत.

(2) तपासा दरम्यान गुन्ह्याचे हत्यार जप्त केले नाही

(3) हेल्मेट जप्ती, प्रथम माहिती देणाऱ्याची मोटारसायकल जप्त करण्याबाबतचा पंचनामा सिद्ध झाला नाही(पंच साक्षीदार पी.डब्ल्यू.२ व तपास अधिकारी तपासले गेले) आणि पंच सत्य सांगण्यास परावृत्त झाले आहेत. एकाही पंचाची तपासणी केली गेली नाही, असा निकाल कनिष्ठ न्यायालयाने दिला आहे. हा निष्कर्ष चुकीचा आहे. (कनिष्ठ न्यायालयाच्या निकालाचे अंतर्गत पान परिच्छेद १५ व १६.)

(4) खालील दोन्ही न्यायालयांनी आरोपी क्रमांक २ ला जखमा झाल्या बद्दलच्या पुराव्यांचे विवेचन केले नाही.

(5) दि.२९ मार्च २००७ रोजी रात्री १०.३० वाजता घटना घडली असूनही त्याकडे लक्ष दिलेले नाही. सुमारे २४ तासांनतर म्हणजे ३० मार्च २००७ रोजी एफआयआर दाखल करण्यात आला असून त्याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

(6) पहिल्या माहिती देणाराने दुष्ट हेतूने तडजोड कराराची अंमलबजावणी करणेसाठी आरोपींवर दबाव टाकणेसाठी खोट्या पद्धतीने अडकवलेले आहे , या मुद्द्यावरील पुराव्यांचे विवेचन कनिष्ठ न्यायालयाने केले नाही . हे निष्कर्ष कनिष्ठ न्यायालयाच्या निकालाच्या अंतर्गत पृष्ठ ४२ च्या शेवटी आहेत.

(7) कनिष्ठ न्यायालयाने **जोसेफ -विरुद्ध -केरळ** [8] राज्य या प्रकरणाच्या निकालामधील एकमेव साक्षीदाराच्या साक्षवर भरवसा या मुद्यावर भर दिला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्या खटल्यातील तथ्यांचा कनिष्ठ न्यायालयाने विचार केला नाही.

(8) विलंबाच्या मुद्द्यावर त्यांनी **रामजी सूर्या पाडवी आणि इतर . -विरुद्ध -महाराष्ट्र राज्य** [9] या प्रकरणातील निरीक्षणांचा आधार घेतला.

---

8) ए आई आर 2003 एस सी 507

9) (1983) 3 एस सी सी 629

## बचाव

14. तिच्या म्हणण्यानुसार, मारहाणीची कोणतीही घटना घडली नाही आणि खरं तर पहिल्या माहितीदारानी चालवलेली मोटारसायकल आणि आरोपी क्रमांक २ ने चालवलेली मोटारसायकल यांच्यात अपघात झाला होता. तिच्या म्हणण्यानुसार, जर आरोपी क्रमांक दोनसह इतरांनी प्रथम माहिती देणाऱ्याला मारहाण केली असेल तर त्याने वैद्यकीय तपासणी का केली नाही.

## फिर्यादी पक्षाचे म्हणणे

15. या उलट विद्वान अधिवक्ता श्री देधिया यांनी पुढील युक्तिवाद केला :-

(1) प्रथम माहिती देणाऱ्याचा पुरावा विश्वासार्ह, खात्रीचा असतो आणि एकाच साक्षीदाराच्या पुराव्याच्या आधारे शिक्षा होऊ शकते हा निश्चित कायदा आहे.

(2) त्यांच्या मते, योग्य रित्या लक्षात घेतले तर,हस्तक्षेपाची हमी देत नाही.

(३) आरोपी क्रमांक दोनलाही दुखापत झाली आहे, यावरून घटनेच्या वेळी तो घटनास्थळी उपस्थित होता, हे स्पष्ट होते.

(४) वैद्यकीय पुराव्याद्वारे तोंडी पुराव्याला पुष्टी मिळते ;

(५) एफआयआर आणि तोंडी पुराव्यात किरकोळ विसंगती आहेत आणि त्यामुळे पी.डब्ल्यू.१ चा पुरावा नाकारला जात नाही.

(६) त्यांनी गुजरात राज्य विरुद्ध भारवाड (सुप्रा) या खटल्याच्या निकालातील मुद्दा क्रमांक ३, ४ आणि ५ मधील निरीक्षणांचा उल्लेख केला जो पृष्ठ ३७ वरील कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद ८ मध्ये पुनलिखित केला आहे.

16. या पार्श्वभूमीवर या न्यायालयाला निष्कर्षांमध्ये बेकायदेशीरपणा आहे का, याची खातरजमा करावी लागणार आहे.

17. न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांच्याशी निगडित एक तातडीची बाब माझ्यासमोर नमूद करण्यात आल्याने मी श्रुतलेखन थांबवून त्याकडे लक्ष देत आहे. आता संध्याकाळचे ५.५३ वाजले आहेत. त्यामुळे पुढील श्रुतलेखन मंगळवारी देण्यात येणार आहे.

18. प्रकरण दि. 26 मार्च 2024 ला बोर्ड वर घेण्यात येईल.

मागील पानावरुन पुढे चालू.

पुनरीक्षणनाची कारणे

19. कनिष्ठ न्यायालयाने नोंदवलेल्या निष्कर्षांमधील बेकायदेशीरतेबद्दलच्या तक्रारीचे मूल्यमापन खालील बाबींवर करणे आवश्यक आहे :-

(1) पी.डब्ल्यू.१ चा पुरावा विश्वासार्ह आणि खात्रीचा आहे का?

(2) तपासात काही त्रुटी आहेत का ज्यामुळे खटल्याच्या निकालावर परिणाम होतो?

(3) कोणत्याही साक्षीदाराची तपासणी न केल्याने संपूर्ण अभियोग पक्षाच्या प्रकरणावर परिणाम होईल का?

(4) एफआयआरला उशीर झाला आहे का आणि त्यामुळे त्याचा परिणाम एकूणच अभियोग पक्षाच्या प्रकरणावर होतो का?

(5) पुनरीक्षण कार्यक्षेत्रात या आधारांचा विचार करता येईल का?

पी.डब्ल्यू.१ चा पुरावा

20. एकाच साक्षीदाराच्या पुराव्याच्या आधारे शिक्षा होऊ शकते, जर त्याच्या पुराव्याने काही ठरावीक कसोट्या पूर्ण केल्या पाहिजेत याबद्दल कायद्याच्या या तत्वाबद्दल वाद होऊ शकत नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने विविध निकालांमध्ये कोणकोणत्या चाचण्या निर्धारित केल्या आहेत त्या यांचा समावेश होतो :-

1. सदर साक्षीदाराने न्यायालयासमोर साक्ष देताना आपल्या पोलिस जबाबात काही सुधारणा केली आहे का?

2. तो घडलेल्या घटनेचा खरा लेखाजोखा देत आहे का म्हणजे फिर्यादी खटल्यानुसार घडलेली घटना आणि आरोपीने मांडल्याप्रमाणे पी डब्लू १ चा जबाबची कसोटीवर चाचणी होणे आवश्यक आहे

3. त्याने तत्काळ पोलिसांची मदत घेतली का, या दृष्टिकोनातून याचा अंदाज बांधता येतो.

4. अजून एक बाजू अशी आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराच्या साक्षीशी त्याचा संबंध नसला, तरी तो एकंदर खटल्याशी संबंधित आहे, म्हणजे तपासादरम्यान कोणत्याही साक्षीदाराचा जबाब नोंदवला गेला आहे की नाही, जखमी प्रत्यक्षदर्शीच्या म्हणण्याला पाठिंबा देण्यासाठी कोण उपलब्ध आहे.

5. ज्या साक्षीदाराचा जबाब तपासादरम्यान नोंदवला जातो पण त्याची तपासणी केली जात नाही, तर एकूण फिर्यादि खटल्यावर याचा काय परिणाम होईल.

21. या दृष्टीकोनातून जेव्हा मी पी.डब्ल्यू.१ चे पुरावे वाचले - प्रथम माहितीदेणारा, जरी अर्जदाराच्या वतीने काही सुधारणा निदर्शनास आणून दिल्या गेल्या असल्या तरी तो तपशील त्या विषयाशी संबंधित आहेत असे मला वाटत नाही

22. त्यांच्या उलटतपासणीच्या परिच्छेद २ मधील मजकुराकडे माझे विशेष लक्ष वेधले गेले . अर्जदार शंकर याने काठी पकडून काठीच्या साहाय्याने मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अर्जदार चेतनभाई पटेल आणि अवधेश यादव यांनी त्यांना मुठीने वार करून मारहाण केल्याची तक्रार आहे. जेव्हा एफआयआरमधील मजकूर तपासला जातो तेव्हा मला जे आढळते ते असे आहे :-

1. त्यांनी असे म्हटले आहे कि सर्व अर्जदार पोलिस चौकीजवळ उभे होते आणि त्यांनी त्यांचा मार्ग अडवला होता.

2. सुरुवातीला अर्जदार क्रमांक २ अश्विन याने आपल्या मोटारसायकलला मागच्या बाजूने धडक दिल्याने तो खाली पडला. खर तर अर्जदार अश्विनही खाली पडला आहे.

3. पुढे त्याने असे म्हटले आहे की, शंकर त्याच्याकडे धावला आणि त्याने वाईट शब्द उच्चारले आणि त्याच्या पाठीवर वार केले.

4. त्यावेळी अर्जदार - चेतन कडे काठी होती आणि त्याने प्रथम माहिती देणाऱ्याच्या डाव्या पायाला वार केला आणि नंतर अर्जदार – चेतनने लाकडी काठी अर्जदार शंकरला दिली आणि शंकर यांनी त्याच्या हेल्मेटवर काठीच्या

साहाय्याने त्याला मारहाण केली. तसेच त्याच्या उजव्या हाताला व डाव्या हाताला मुठीने वार केले, तर अश्विनच्या हातात दगड होता. त्याने त्याच्या हेल्मेटवर वार केला.

6. तर, अर्जदार अवधेश आणि चेतन यांनी त्याचे हेल्मेट काढले आणि अर्जदार अश्विनने त्याला दगडाच्या सहाय्याने मारहाण केली.

7. पुढे त्याने आरडाओरडा केला आणि आजूबाजूचे लोक घटनास्थळी आले आणि परिणामी अर्जदार पळून गेले. त्यानंतर त्यांनी कंपनीच्या पर्सनल मॅनेजरला मोबाइलद्वारे फोन केला आणि कंपनीच्या मोबाइलवरून प्रथम माहिती देणाऱ्याला विनोबा भावे, सिव्हिल हॉस्पिटल, सिल्वासा येथे हलविण्यात आले.त्यांनी प्रवीण ड्रायव्हर आणि सुरक्षा अधिकारी एस. एन. यादव यांची नावे दिली आहेत.

23. अनेक सुधारणा माझ्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. **काळाच्या ओघात काही सुधारणा झाल्या आहेत आणि त्यात भौतिक तपशीलांचा विचार केला जात नाही.**

ट्रायल कोर्टासमोर मांडण्यात आलेल्या आवृत्या

24. खालील न्यायालयांसमोर दोन अर्थकथन उपलब्ध आहेत:-

1. प्रथम अभियोग पक्षाचे अर्थकथन म्हणजे या सर्व अर्जदारांनी प्रथम माहिती देणाऱ्याला मारहाण केली .

2. तर, अर्जदार अश्विनने उलट कथन केले आहे.

वस्तुतः, त्यांच्या मोटारसायकलने प्रथम माहिती देणाऱ्याच्या मोटारसायकलला धडक दिल्याने दोघेही खाली पडले आहेत. दुसर्या शब्दांत सांगायचे तर, त्याने पहिल्या माहितीदाराने सांगितलेली वस्तुस्थिती नाकारली आहे.पहिल्या माहितीदाराच्या उलटतपासणीच्या पद्धतीवरून (अंतर्गत पान ५ पान ७३ वर) बचावाची ही ओळ आपल्याला सापडते.

त्यांना दिलेल्या सूचना पुढीलप्रमाणे :-

1. सूचना " दि.३० मार्च २००७ रोजी कोणतीही घटना घडली नाही

2. पुढील सूचना "प्रथम माहिती देणारा मोटारसायकलवरून पडला व त्यामुळे तो जखमी झाला ".

3. तपास अधिकारी पी.डब्ल्यू.३ यांना खालील मुद्द्यांवर सूचना देण्यात आल्या –

अ. "फिर्यादी मोटारसायकलवरून खाली पडला आणि त्यामुळे जखमी झाला".

25. **३१३ च्या निवेदनात** अर्जदारांनी स्वतःच्या अर्थकथनानुसार घटना कशी घडली याबद्दल काहीही सांगितलेले नाही. त्यांनी केवळ असे स्पष्टीकरण दिले कि "केवळ त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी आणि नोकरीवरून काढून टाकण्यासाठी अशी साक्षीदाराने खोटी साक्ष दिली”.

26. हे खरे आहे कि पहिला माहितगारने एफआयआर मध्ये आणि न्यायालयासमोर सांगितले कि अर्जदार - अश्विन जमिनीवर पडला. पी.डब्ल्यू.१ - सुरेश कलेरिकल आणि पी.डब्ल्यू.४ - डॉ.सुनील पटेल यांची तपासणी केली. - डॉ. सुनील पटेल यांनी

अर्जदार अश्विनला झालेल्या दुखापती अभिलेखावर  आणल्या आहेत.त्यामध्ये अश्विनच्या डाव्या गुडघ्याच्या सांध्याला घर्षण झाले आहे  , तर पहिल्या माहिती देणारााास  ताज्या जखमा झाल्या आहेत, त्यापैकी एक उजव्या खांद्याच्या टोकावर आणि दुसरी टीबिया वर आणि तिसरी डोक्याच्या मागच्या बाजूच्या भागावर आहे.

27. या वैद्यकीय अधिकाऱ्याने दोन्ही जखमींची तपासणी केलेली नाही हे खरे आहे, परंतु त्यांनी अभिलेखच्या आधारे आणि दोघांची तपासणी करणाऱ्या डॉ. मनोज सिंग यांच्या हस्ताक्षराची ओळख असल्याने साक्ष दिली. ज्ञान आणि अनुभवाच्या आधारे जमिनीवर पडल्यास दोघांनाही इजा होण्याची शक्यता असल्याचे मत या डॉक्टरांनी व्यक्त केले. अर्जदारांच्या विद्वान  वकिलाने या उत्तराचा फायदा  घेत दुखापती हल्ल्याचा परिणाम नसून जमिनीवर पडल्याने झालेल्या आहेत असा  युक्तिवादाला पुष्टी देण्याचा प्रयत्न केला.

अर्जदार/आरोपी अश्विनला झालेल्या जखमांचे निष्कर्ष

28. या पैलूवरील निष्कर्षांच्या अचूकतेचे मूल्यमापन करण्यासाठी, मी विद्वान  न्यायाधीशांची खटल्याच्या संदर्भात निरीक्षणे पाहिली आहेत. विद्वान न्यायाधीशांनी  निकालाच्या परिच्छेद क्रमांक ६, ७, ९, ११ आणि १२ मध्ये हा पैलू हाताळला  आहे. अर्जदार अश्विनला कोणत्या जखमा झाल्या आहेत याचाही कनिष्ठ न्यायालयाने विचार केला आहे परंतु अर्जदार - अश्विनला झालेल्या दुखापतीचे स्पष्टीकरण देण्यासाठी असलेला भार संदर्भात कनिष्ठ न्यायालयाच्या निरीक्षणाचा विचार करणे समर्पक ठरेल. परिच्छेद क्र.९ मध्ये असे नमूद केले आहे :-

"रात्री उशिरा अश्विनला दुखापत कशी झाली आणि विनोबा भावे रुग्णालयात त्याची तपासणी का करण्यात आली, याचे स्पष्टीकरण आरोपींनी दिलेले नाही. त्यामुळे घटनेच्या ठिकाणी आरोपी अश्विन ची उपस्थिती सिद्ध होते".

29. अर्जदार - अश्विनच्या गुडघ्याच्या सांध्याला झालेल्या दुखापतीबद्दल आपण समजू शकतो परंतु आरोपीने अश्विनला दुखापत झाल्याचे स्पष्ट केले नाही हा निष्कर्ष मान्य केला जाऊ शकतो का? हे असे नाही कारण पुरावा सिद्ध करण्याचा भार मान्य नियमांनुसार आरोपींवर नसतो.

अभियोग पक्षावर असलेला सिध्दिभार :--

1. कथित वस्तुस्थिती घातडल्याचे सिद्ध करणे आणि

2. या घटनेतून जर आरोपीस जखमा झाल्या असतील तर ते सुद्धा सिद्ध करणे .

आपण आरोपीवर भार कसा टाकू शकतो आणि जखमांचे स्पष्टीकरण न दिल्याबद्दल त्याला जबाबदार कसे ठरवू शकतो ? खालील दोन्ही न्यायालयांचा हा पूर्णपणे चुकीचा दृष्टिकोन आहे. पुराव्यांचे विवेचन करताना जर कनिष्ठ न्यायालयाने चुकीच्या पद्धतीने पुराव्यांचे नियम लागू केले असतील आणि काही निष्कर्षापर्यंत पोहोचले असतील, तर निश्चितच पुनरीक्षण न्यायालयाला हस्तक्षेप करण्यास वाव आहे. आणि ते मी केलेले आहे. घटनेदरम्यान आरोपीला इजा झाली असेल तर आरोपी व्यक्तीला पर्याय उपलब्ध आहेत.

एकतर <u>तो असे करू शकतो :--</u>

1. <u>त्याचा सहभाग </u>आणि उपस्थिती नाकरु शकतो.

2. तो म्हणू शकतो <u>की तो उपस्थित होता</u> आणि हे त्याला झालेल्या जखमांचे स्पष्टीकरण आहे .

30. दुखापतीचे स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी त्याने स्वत:वर घेतली, तरी ती सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर असते तेवडी नसते. विशेषतः प्रथम माहिती देणारे सुरेश आणि आय.ओ. पी.डब्ल्यू.क्र.३ यांचे पुरावे तपासले असता आपल्याला असे लक्षात येईल की केवळ " प्रथम माहिती देणारा मोटारसायकलवरून पडला "असे सुचविण्यात आले होते. परंतु अर्जदार अश्विनला दुखापत कशी झाली याबाबत कोणतीही सूचना देण्यात आलेली नाही. याचा अर्थ अर्जदार अश्विनसह अर्जदारांनी या बाबींवर मौन बाळगणे पसंत केले.आणि शेवटी तीच त्यांची निवड आहे.

31. तरीही आरोपींना झालेल्या जखमांचे स्पष्टीकरण देण्याच्या जबाबदारीतून अभियोग पक्ष मुक्त झालेला नाहीत<u>. ते वेगळ्या पद्धतीने करू शकतात</u>:-

(1) एकतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदारामार्फत स्पष्टीकरण देऊन

किंवा

(2) तपास अधिकाऱ्यामार्फतही.

या प्रकरणात एफआयआरमधील प्रत्यक्षदर्शी पी .डब्ल्यू.१ (आम्ही दोघेही मोटारसायकलवरून पडलो ) तसेच पुराव्यात अर्जदार अश्विन जमिनीवर पडल्याचे नमूद केले आहे. सरकारी पक्षाच्या वतीने दिलेले स्पष्टीकरण मानता येईल का?

31. असे होऊ शकते की अर्जदार अश्विनने दिलेल्या धडक मुळे प्रथम माहिती देणारा सुरेश जमिनीवर पडला आहे आणि अर्जदार अश्विनही. पण मुद्दा एवढ्यावरच थांबत नाही. अर्जदार अश्विन जमिनीवर पडला असेल तर त्याने पहिल्या माहितीदाराला कोणत्या पद्धतीने मारहाण केली, असा प्रश्न निर्माण होतो.एकतर अर्जदार अश्विन उभा राहिला असावा आणि आधी माहिती देणाऱ्याच्या दिशेने गेला असावा आणि नंतर त्याला मारहाण केली असावी. दुसरी शक्यता अशी असू शकते की, जमिनीवर पडल्यानंतर अर्जदारांच्या वतीने मांडल्याप्रमाणे पुढील कोणतीही घटना घडली नसावी. प्रथम माहिती देणाऱ्याचे पुरावे वाचले तर लक्षात येईल की :--

1. पहिल्या माहितीदाराने आरोपीला विचारले की त्यांनी त्याला का थांबवले.
2. आरोपीने उत्तर दिले की "प्रथम माहिती देणारयने पार्किंग विभागातील त्यांच्या बेशिस्त कारवायाना परवानगी देत नाही त्यामुळे त्यांना पुढे जाऊ देणार नाहीत".
3. प्रथम माहिती देणाऱ्याने बेशिस्त कारवाया हाताळण्याच्या आपल्या दृष्टिकोनाचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला., त्यावेळी अर्जदार अश्विनने पहिल्या माहिती देणाऱ्याच्या मागच्या बाजूने आपली दुचाकी धडकवली आणि तो जमिनीवर पडला.
4. अशा विचित्र परीस्थिती मध्ये त्यावेळी उर्वरित तीन आरोपींनी त्याला मारहाण केली.

सरतपासाच्या शेवटी अर्जदार अश्विनही जमिनीवर पडल्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले. ज्या पद्धतीने ही घटना घडली आहे, त्याचा बारकाईने समीक्षण होणे गरजेचे आहे.

## इतर साक्षीदारांची चौकशी न होणे

32. हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की पी.डब्ल्यू.१ वगळता इतर कोणतेही साक्षीदार घटनेच्या प्रत्यक्ष घटनेबद्दल फिर्यादी पक्षाच्या वतीने तपासले गेले नाहीत.पी.डब्ल्यू.१ ने सांगितल्याप्रमाणे माणसे जमली असली तरी कोणाचीही तपासणी केली गेली नाही. प्रथम माहिती देणाऱ्याने आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बोलावून रुग्णवाहिकेतून दोन जण आले आणि त्यांना विनोबा भावे रुग्णालयात हलविण्यात आले. विशेष म्हणजे यापैकी एकाही साक्षीदाराची चौकशी सरकारी पक्षाच्या वतीने करण्यात आली नाही

33. प्रत्येक प्रकरणात प्रत्यक्षदर्शींच्या साक्षीला दुजोरा मिळणे आवश्यक आहे, हा सार्वत्रिक नियम नाही. मी ट्रायल कोर्ट आणि अपीलीय कोर्टाचे निष्कर्ष वाचले आहेत , दुर्दैवाने साक्षीदारांची तपासणी न करण्याबद्दल च्या पैलूवर कोणताही निष्कर्ष नाहीत. हेहि खरे आहे की कनिष्ठ न्यायालय आणि अपिलीय न्यायालयाने एकल प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराच्या पुराव्यावर अधिक भर दिला आहे, हेही खरे आहे. गुजरात राज्य विरुद्ध भारवाड (उपरोक्त ) प्रकरणातील निरीक्षणे आणि जखमी साक्षीदारांच्या पुराव्यांची विवेचन करण्यासाठी घालून दिलेल्या निकषांच्या आधारे कनिष्ठ न्यायालयाने परिच्छेद क्रमांक ८ मध्ये आपल्या निष्कर्षाचे समर्थन केले आहे, हेही खरे आहे. त्या नियमांबद्दल वाद होऊ शकत नाही पण ते प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थितीवर अवलंबून असते.

<u>पोलिसांना तात्काळ तक्रार नाही.</u>

34. ही घटना २९ मार्च २००७ रोजी रात्री २०.३० वाजता घडली होती, आणि दि ३० मार्च २००७ रोजी २०.३० वाजता पोलिस ठाण्यात याची नोंद करण्यात आली हे सुद्धा खरे आहे . म्हणजेच घटनेच्या तब्बल २४ तासांनंतर ही घटना नोंदवण्यात आली आहे. याला उशीर मानता येणार नाही पण एफआयआर लगेच दाखल केला गेला नाही. एफआयआर दाखल करण्यास उशीर झाला असे मानले जाऊ शकते का ? अभिलेख पाहता प्रथम माहिती देणाऱ्याला तपासणीनंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले नाही, अभिलेख पाहता त्यांनी हि तक्रार वैयक्तिक रित्या नव्हे तर कंपनीचा कर्मचारी म्हणून दाखल केली आहे, त्यामुळे त्याला कंपनीच्या कर्मचार्यांनी मदत केली आणि कंपनीच्या कर्मचार्यांनीच हॉस्पिटल मध्ये भरती केले. ही परिस्थिती लक्षात घेता विनोबा भावे रुग्णालयात तपासणी केल्यानंतर लगेचच तक्रार दाखल करण्यापासून प्रथम माहिती देणाऱ्याला कशामुळे रोखले गेले? पण दुर्दैवाने त्याच्या बाजूने किंवा फिर्यादी पक्षाकडून कोणतेही स्पष्टीकरण समोर येत नाही.

35. त्यामुळे या दृष्टीकोनातून पुराव्यांची पाहणी केले तर मला जे आढळते ते म्हणजे पी.डब्ल्यू.१ च्या एकमेव साक्षीला दुजोरा नाही. २४ तासांनंतरही एफआयआर दाखल करण्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण समोर येत नाही. वर सांगितल्याप्रमाणे कनिष्ठ न्यायालयासमोर मांडण्यात आलेल्या बाजूचा विचार करता, इतर साक्षीदारांची तपासणी अत्यंत आवश्यक असल्याचे या न्यायालयाला वाटते. जेव्हा मी दोन्ही निर्णयांचा अभ्यास केला तेव्हा <u>त्यापैकी कोणीही या पैलूंचा विचार केलेला नाही.</u>शेवटी, पुराव्याचे विवेचन करणे म्हणजे काय

तर पुरावे कोणत्या मुद्द्यांवर जोडले गेले आहेत आणि त्यात अशा काही बाबींचाही समावेश आहे ज्यावर फिर्यादी पक्षाने भर दिला नाही.

36. या प्रकरणात मी असा निष्कर्ष काढला की अभियोग पक्षाने प्रथम माहिती देणाऱ्याच्या म्हणण्याला पुष्टी देण्यासाठी साक्षीदार तपासले पाहिजेत. वस्तुस्थितीचा विचार करता हे अत्यंत आवश्यक होते पण दुर्दैवाने खालील दोन्ही न्यायालयांनी या पैलूचा विचार केलेला नाही.ट्रायल कोर्टाने आरोपींवर जखमेचे स्पष्टीकरण देण्यासाठी दबाव टाकला . ते असे असू शकत नाही. हे पुराव्यांचे विवेचन करण्याच्या मान्य नियमांच्या विरोधात आहे.खालील दोन्ही न्यायालयांनी केवळ तक्रारदाराच्या पुराव्यावर जोर दिला पण गुन्ह्याच्या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी ते कसे पुरेसे असेल परंतु पुरावे उपलब्ध असूनही ते जोडले गेले नाहीत. या गोष्टीकडे खालील दोन्ही न्यायालयांनी दुर्लक्ष केले आहे. यात पहिल्या माहिती देणाऱ्याचा दोष नसून अभियोग पक्षाचा दोष आहे. हे लक्षात घेता, खालील दोन्ही न्यायालयांचे निष्कर्ष कायद्याच्या नजरेत टिकू शकत नाहीत.

37. खालील दोन्ही न्यायालयांनी केलेली चूक सुधारण्यासाठी हे न्यायालय निश्चितच पुनरीक्षण अधिकारक्षेत्राचा वापर करू शकते. मी आधीच जोडलेल्या पुराव्यांच्या आधारे या निष्कर्षापर्यंत पोहोचलो नाही कारण तो पुराव्याच्या विवेचनाशी संबंधित आहे ज्याला सामान्यत: पुनरीक्षण कार्यक्षेत्रात परवानगी नाही. मी पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष दिले आहेत जे अभियोग पक्षाच्या वतीने जोडले जाऊ शकले असते परंतु जोडले गेले नाहीत.

38. वरील चर्चेतून मी असा निष्कर्ष काढला की खालील दोन्ही न्यायालयांनी सर्व अर्जदारांना संशयाचा लाभ द्यायला हवा होता. शिक्षेचा निर्णय रद्द करण्याची गरज आहे. म्हणून खालील आदेश :-

## आदेश

(i) पुनरीक्षण अनुमत.

(ii) मुख्य न्यायदंडाधिकारी, दादर आणि नगर हवेली, सिल्वासा यांच्या न्यायालयाने एससीसी क्रमांक ५५/२००८ मध्ये आयपीसीच्या कलम ३२३, ३४१ आणि ३४ अन्वये दंडनीय गुन्ह्यांसाठी दिलेला आणि सत्र न्यायाधीश , दादर आणि नगर हवेली, सिलवासा यांच्या न्यायालयाने दि.३१ जानेवारी २०१७ रोजी फौजदारी अपील नं. १/२०१५ मध्ये कायम ठेवलेला अपराधसिद्धीचा न्यायनिर्णय रद्द करण्यात येत आहे.

(iii) अर्जदार क्रमांक १- शंकर छाना वसवा, अर्जदार क्रमांक २- अश्विन रामनरेश सिंह, अर्जदार क्रमांक ३ चेतन माकन पटेल आणि अर्जदार क्रमांक 4- अवधेश संपत यादव यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे .

(iv) दंडाची रक्कम भरली असल्यास ती परत करण्यात यावी.

(v) पुनरीक्षण अर्ज निकाली काढला जातो.

[**न्यायमूर्ती एस. एम. मोडक**]

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही

कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.